03-02-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 02/02/2025 11:41 PM Page 1



# हरमल किनारीभागातील अतिक्रमणे हटविण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १ :** किनारी भागात परप्रांतीय लोकांची मनमानी व उद्दामपणा नागरिकांसाठी डोकेदुखी बनली असून,रस्त्यावरील आश्वादने, नागरिकांच्या जीवितहानीस कारणीभूत होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली.सदर अतिक्रमणे त्वरित हटवावीत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

या भागात गेल्यावर्षी रस्त्यावरील आश्वादनामुळे दोन हंगामी दुकानांना आग लागण्याची घटना घडली होती.सुदैवाने वीज पुरवठा खंडित केल्याने भीषण दुर्घटना टळली होती, असे एका व्यावसायिकाने सांगितले. जेव्हा त्या भागात पोलीस आऊट पोस्ट होते. त्यावेळी उपअधीक्षकांनी सदरचे गैरप्रकार रोखण्यासाठी सगळी अतिक्रमणं हटविण्याचे आदेश दिले होते व पोलिसांनी व्यक्तिशः राबून सगळी आश्वादने हटविली होती,असे सदर व्यावसायिकाने सांगितले. मात्र आऊट पोस्ट स्थलांतर झाल्यानंतर इथले वातावरण धोकादायक बनल्याचे दिसून येते, असे एका पर्यटकाने बोलून दाखवले.



हरमल : किनारी भागतील रस्त्यावर अशी आश्वादने धोकादायक स्थितीत.

या किनारी भागातील रस्त्याच्या उजव्या बाजूस फूटपाथ घातल्याने वाहनाच्या वर्दळीचा पादचाऱ्यांना त्रास होत नाही.मात्र सद्या फूटपाथ शोभेच्या स्थानी असून, दुतर्फा असलेल्या दुकान, गॅरेज व्यावसायिकांनी पूर्ण व्यापली असल्याने पादचारी रस्त्यावरून चालत जाताना दिसत असल्याने नागरिक उदय वायंगणकर यांनी संताप व्यक्त केला.

दरम्यान, मागील ग्रामसभेत फूटपाथ काढून टाकण्याचा ठराव चर्चेसाठी आला होता,मात्र व्यवसायिकांना तिथून हटवावे असे ठरले होते.व्यवसायिकांना नोटिसा पाठवून कायमचे बंद करण्याचे ठरले होते. मात्र पंचायतीचे प्रयत्न थिटे पडत असून, पंचायत धाक निर्माण करण्यात अपयशी ठरल्याचे वायंगणकर यांनी व्यक्त केले. तरी पोलिस व पंचायत समितीने याबाबत कारवाई करून पर्यटन स्थळाचा दर्जा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पावले उचलावीत अशी मागणी होत आहे.



# पेडणे तालुका शेतकरी सोसयटीची बैठक उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २ :** पेडणे तालुका शेतकरी सेवा सहकारी सोसायटीची खास सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष विठोबा बगळी यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. या

व्यासपीठावर उपाध्यक्ष शांबा सावंत, संचालक सर्व श्री संतोष मळीक,ज्ञानेश्वर परब, गजानन कोरगावकर,रामदास परब ,ड अमित सावंत,उमेश गाड,कार्यकारी संचालक विनायक ठाकूर,आदी उपस्थित होते.

यावेळी संस्थेच्या बँकिंग विभागाची कर्ज मर्यादा १ लाखावरून ५ लाखापर्यंत करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. देवेंद्र परब यांनी मांडलेल्या या ठरावास लवू सावंत यांनी अनुमोदन दिले,

यावेळी झालेल्या चर्चेत ॲड. हनुमंत गवंडी, लवू सावंत, उल्हास नाईक, देवेंद्र परब आदींनी भाग घेतला व सूचना केल्या.

संस्थेचे हित लक्षात घेता संस्थे मार्फत प्रामुख्याने शेतकऱ्याना कर्ज पुरवठा करावा मोठ्या रकमेची कर्जे देण्यापेक्षा गरजू शेतकऱ्यांना लहान लहान कर्जे द्यावीत त्याची वसुली करण्यासाठी कडक अंमलबजावणी करावी. तसेच कर्ज पुरवठा करताना आवश्यक ती खबर दारी घ्यावी असे यावेळी सांगण्यात आले.

या सभेत अन्य विष य नसल्याने सभा संपल्याचे अध्यक्षांनी जाहीर केले. अध्यक्ष विठोबा बगळी यांनी स्वागत करून सभेचा उद्देश स्पष्ट केला.उपाध्यक्ष शांबा सावंत यांनी आभार मानले.

पान १ वरून

## खनिज वाहतुकीचा तिढा सुटला!

आहे. ट्रक मालक संघटना , वेदांतचे प्रतिनिधी आणि दोन स्थानिक आमदार यांच्यात झालेल्या बैठकीनंतर हा तोडगा निघाला आहे. मात्र स्थानिक ट्रक चालक हे काम करु शकतील की, नाही याची खात्री करण्यासाठी पुढचे १० दिवस प्रायोगिक तत्वावर ही वाहतूक स्थानिकाकडूनच सुरू राहील आणि त्यानंतर पुन्हा एकदा परिस्थितीचा आढावा घेतला जाईल, असे खाण कंपनीने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

स्थानिकांचा रोजगार मारून बाहेरील वाहतूक ठेकेदाराला खनिज वाहतुकीसाठी नेमल्यामुळे डिचोली, मये भागातल्या ट्रक चालकांनी वेदांतची खनिज वाहतूक रोखून धरली होती. कंपनी व्यवस्थापनाने ट्रक मालक संघटनेशी संवाद साधून यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला. मात्र गेले आठ दिवस हा तिढा सुटत नव्हता. अखेर मयेचे आमदार प्रेमेंद्र शेट आणि डिचोलीचे आमदार चंद्रकांत शेटये यांनी ट्रक चालक आणि कंपनी व्यवस्थापनात मध्यस्थी करून हा 'डेड लॉक' सोडवला आहे. त्यानुसार पुढचे दहा दिवस प्रायोगिक तत्त्वावर कंपनीच्या सर्व टप्प्यावरची खनिज वाहतूक करण्याचे काम स्थानिक ट्रक चालकांनाच देण्यात येणार आहे. तोपर्यंत बाहेरील ठेकेदाराचे १२ चाकी ट्रक बंद राहणार आहेत. १० दिवसांनी स्थानिक ट्रक चालकांच्या क्षमतेचे मूल्यमापन होणार असून त्यानुसार पुढचा निर्णय होणार असल्याची माहिती मये आमदार प्रेमेंद्र शेट यांनी या बैठकीनंतर दिली आहे.

मये पिळगाव भागातील खनिज वाहतूक करण्यासाठी १२ चाकी ट्रक असलेल्या बाहेरील कंत्राटदाराला वेदांत कंपनीने वाहतुकीचे काम दिल्यामुळे स्थानिक ट्रक चालकांवर एक प्रकारे बेकारीची कु–हाडच कोसळली. स्थानिक ट्रक मालकांच्या मते मायनिंग सुरू होईल या आशेने त्यांनी गेली बारा वर्षे आपल्या वाहनांसाठी काम नसतानाही हजारो रुपये देखभालीसाठी खर्च केले आहेत. अशा परिस्थितीत आता मायनिंग सुरू झाल्यावर जर कंपनी स्थानिकांच्या वाहतूक क्षमतेवर आक्षेप घेत बाहेरच्यांना ट्रान्सपोर्टचे काम देत असेल तर ते सहन केले जाणार नाही, असा इशारा देत या ट्रक चालकांनी कंपनीला खनिज वाहतूक बंद करायला भाग पाडले होते. त्यामुळे हा तिढा निर्माण झाला होता. दरम्यान कोणत्याही प्रकारची आणि कितीही खनिज वाहतूक करण्यास आम्ही तयार असल्याचे ट्रक मालक संघटनेने स्पष्ट केले आहे. मात्र पुढचे दहा दिवस स्थानिक ट्रक चालकांची ही परीक्षा सुरू राहणार असून त्यानंतर त्यांच्या क्षमतेचे मूल्यमापन होणार असल्याची माहिती आमदारांनी दिली आहे.

---

## कुख्यात गँगस्टर ग्योंग दिल्ली पोलिसांच्या स्वाधीन

केली.या आरोपीवर दिल्ली आणि पंजाबसह भारतातील विविध राज्यांमध्ये दरोडा, खून, हत्येचा प्रयत्न, खंडणीसाठी अपहरण करण्यासाठी एखाद्याला मृत्यूची भीती किंवा गंभीर दुखापत अशा गुन्ह्यांमध्ये सहभाग असल्याचा आरोप आहे, असे प्रवक्त्याने सांगितले. दरम्यान, दिल्ली पोलिसांनी सांगितले की, ग्योंगला फिलीपिन्स ब्युरो ऑफ इमिग्रेशन (पीबीआय) ने बाकोलोद शहरातून अटक केली, भारताच्या प्रत्यार्पणाच्या विनंतीवरून कारवाई केली.पीबीआय अधिकाऱ्यांच्या मते, ग्योंगची ओळख भारतीय–नेपाळी नागरिक आणि फुटीरतावादी दहशतवादी नेटवर्कमधील एक प्रमुख व्यक्ती म्हणून झाली, असे दिल्ली पोलिसांनी सांगितले. ग्योंगला बेकायदेशीर शस्त्रे बाळगल्याबद्दल हरियाणामध्ये जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. पॅरोलवर असताना, त्याने डिसेंबर २०१७ मध्ये पानिपतमध्ये खून केला आणि नंतर परदेशात पळून गेला, असे पोलिसांनी सांगितले.

# मांद्रे महाविद्यालयाचे स्पर्धांमध्ये उल्लेखनिय यश

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. २ :** मांद्रे विकास परिषदच्या मांद्रे कॉलेज ऑफ कॉमर्स, इकॉनॉमिक्स अँड मॅनेजमेंट, मांद्रे येथे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण सोहळा मोठ्या उत्साहात झाला.

यावेळी कार्यक्रमाचे मुख्य अतिथी के. डी. पवार, प्राचार्य, बी. एम. घोगटे हायअर सेकंडरी स्कूल, तर प्रमुख पाहुण्या ग्रामपंचायत मांद्रेच्या सरपंच तारा हदफडकर उपस्थित होत्या. विशेष अतिथी म्हणून अनिल राणे, अधिवक्ता रामकांत खलप, प्राचार्य प्रा. तुषार अनवेकर, व्यवस्थापन समिती सदस्य श्री. गोविंद असगावकर व शंकर चोडणकर, तसेच पीटीएच्या उपाध्यक्षा सौ. प्रीती कार्वेलो यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य प्रा. तुषार अनवेकर यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी महाविद्यालयाच्या २०२४–२५ या शैक्षणिक वर्षाचा वार्षिक अहवाल सादर केला.

महाविद्यालयातील विविध विभागांनी वर्षभर आयोजित केलेल्या





स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. तसेच सर्वोत्कृष्ट एनएसएसस्वयंसेवक, उत्कृष्ट क्रीडापटू आणि सांस्कृतिक पुरस्कार विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे, मिस डायना पिंटो हिला २०२४–२५ या वर्षासाठी मांद्रे कॉलेजची विद्यार्थीनी' म्हणून गौरविण्यात आले.

यावेळी अधिवक्ता रामकांत खलप यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत भविष्यातही अशीच कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहित केले. के. डी. पवार यांनी विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करण्यास प्रेरित केले. त्यांनी विद्यार्थ्यांना स्वप्नपूर्तीसाठी कठोर परिश्रम करण्याचा सल्ला दिला आणि जीवनातील संकटांना आत्मविश्वासाने तोंड द्यावे, असे मार्गदर्शन केले. अनिल राणे यांनी संस्कृतीच्या जतनाचे महत्त्व आणि जबाबदार नागरिक होण्याची गरज यावर प्रकाश टाकला. सरपंच तारा हदफडकर यांनी विद्यार्थ्यांना जीवनातील मोलाचे धडे देत सन्मान व सहकार्याची वृत्ती जोपासण्याचा सल्ला दिला. पारितोषिक वितरणानंतर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नृत्यस्पर्धा, सोलो डान्स आणि फॅशन शो सादर करत उपस्थितांचे मनोरंजन केले.

या सोहळ्यास महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते. संपूर्ण कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला व कार्यक्रम यशस्वी करण्यास हातभार लावला.

# 'बाबूजी' नाटकाने रसिकांची मने जिंकले

▸ **पणजीत भारंग नाट्य महोत्सवाचा समारोप**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २ :** राष्ट्रीय नाट्य विद्यालय नवी दिल्लीने आपल्या प्रतिष्ठेच्या भारत रंग महोत्सवाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त कला संस्कृती संचालनालय गोवाच्या सहयोगाने कला अकादमीच्या मास्टर दीनानाथ मंगेशकर कला मंदिरात आयोजित केलेल्या भारंग नाट्य महोत्सवाचा शनिवारी समारोप झाला. एन. एस. डी च्या रीपर्टरी कंपनीने समारोपाचे सादर केलेले 'बाबूजी' हे नाटक रसिकांची मने जिंकून गेले. या नाटकाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मिथिलेश्वर यांच्या विभांशु वैभव यांनी हिंदीत अनुवादित केलेल्या या नाटकाचे राजेश सिंग यांनी उत्कृष्ट दिग्दर्शन केले होते व त्यांनी बाबुजीची प्रमुख भूमिकाही



पणजी : राजेश सिंग यांचा सत्कार करताना गोविंद गावडे. सोबत भरत गुप्त, सगुण वेळीप, अवतार साहनी, मिलिंद माटे व इतर.

प्रभावीपणे वठवली. सुमधूर संगीताचा साज या नाटकाला होता व सर्वांनी समरसून भूमिका वठविल्या. समारोप सोहळ्याला कला संस्कृती मंत्री गोविंद गावडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते राजेश सिंग, एन. एस.डी. चे स्नातक तथा प्रसिद्ध रंगकर्मी अवतार साहनी, एन.एस. डी.चे अधिकारी सत्येंद्र कुमार, उत्कल कुमार तिवारी, शशांक शेखर तिवारी, आशुतोष कुमार तसेच स्नातक विष्णुपद बर्वे व दक्षा शिरोडकर यांचा गौरव करण्यात आला. यावेळी व्यासपीठार एन एस डी चे उपाध्यक्ष पद्मश्री भरत गुप्त, कला संस्कृती संचालक सगुण वेळीप, उपसंचालक मिलिंद माटे व्यासपीठावर उपस्थित होते.

गोविंद गावडे यांनी हा महोत्सव गोव्यात आयोजित करून दर्जेदार नाटकांचा आस्वाद घेण्याची संधी दिल्याबद्दल एन.एस.डी.ला दुवा दिला व एन.एस.डी च्या गोव्यातील उपक्रमांना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे अभिवचन दिले. अंतरा भिडे यांनी सूत्रसंचालन केले.

# सावंतवाडी येथे विभागीय संमेलन उत्साहात

## गोव्यातील तीन कवयित्रींचा सहभाग

■ टीम दैनिक हेराल्ड

**नावेली, दि. २ :** संमेलने आयोजित करणे हे सोपे आहे परंतु त्यात सातत्य टिकवून ठेवणे हे अत्यंत कठीण काम आहे. सावंतवाडी मध्ये सतत अठरा वर्षे हे कवीसंमेलन आयोजित करण्यात येत आहे, हे निश्चितच कौतुकास्पद आहे, असे उद्गार कोमसापच्या केंद्रीय मंडळाच्या अध्यक्षा नमिता कीर यांनी काढले.

चिंतामणी साहित्य सहयोग सहकारी प्रकाशन संस्था व आरती मासिकाच्या प्रमुख आयोजना अंतर्गत सावंतवाडी येथे कोकण मराठी साहित्य परिषद सावंतवाडी व श्रीराम वाचन मंदिर यांच्या सहकार्याने आर.पी.डी. हायस्कूल सावंतवाडी येथील सभागृहात निमंत्रित कवयित्रींचे १८ वे विभागीय संमेलन आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी नमिता कीर बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर आयोजिका आणि ज्येष्ठ साहित्यिका उषा परब, संमेलनाच्या अध्यक्षा हेमांगी नेरकर ,डॉ. इला माटे, गोव्यातील निमंत्रित कवयित्री कविता आमोणकर, प्रा, पौर्णिमा केरकर, रजनी रायकर यांची उपस्थिती होती. सुरवातीला प्रा. उषा परब यांच्या हस्ते संमेलनाच्या अध्यक्षा हेमांगी नेरकर व प्रमुख अतिथी नमिता कीर यांचा सन्मान करण्यात आला. तर कोमसाप सावंतवाडी शाखेचे अध्यक्ष ॲड. संतोष सावंत , चिंतामण साहित्य सहयोग सहकारी प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष डॉ. जी.ए. बुवा, श्रीराम वाचन मंदिरचे अध्यक्ष प्रसाद पावसकर, प्रा. सुभाष गोवेकर यांच्या हस्ते मान्यवर व निमंत्रित कवयित्रींचा सन्मान करण्यात आला.



सावंतवाडी : विभागीय संमेलनात कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्षा नमिता कीर. सोबत हेमांगी नेरकर, उषा परब व इतर.

साहित्यिका हेमांगी नेरकर यांनी सर्व कवितांचे रसग्रहण करताना लेखन करणाऱ्या महिला या कवितेच्या माध्यमातून आपले भावविश्व अचूक टिपतात असे सांगितले. यावेळी आरती मासिकातर्फे आयोजित स्सिंधुदुर्ग – गोवा मर्यादित काव्य लेखन स्पर्धेतील मनीषा पाटील (प्रथम), आर्या बागवे व चित्रा क्षीरसागर (द्वितीय), श्रुती हजारे (तृतीय), सर्वदा जोशी, सोनाली नाईक, (उत्तेजनार्थ) या विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्ञा मातोंडकर यांनी केले. आभार सौ. चव्हाण यांनी मानले.

# गाळेल येथे युवकाची आत्महत्या

■ टीम दैनिक हेराल्ड

**बांदा, दि. २ :** गाळेल येथील एका युवकाने आपल्या राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. हा प्रकार रविवारी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास उघडकीस आला. अक्षय उर्फ प्रथमेश महादेव परब (वय ३०, रा. गाळेल) असे त्याचे नाव आहे. मात्र आत्महत्या कोणत्या कारणाने केली हे मात्र अद्याप स्पष्ट झाले नाही. त्याच्या पश्चात वडील व भाऊ असा परिवार आहे.वर्षभरापूर्वी त्याच्या आईचे कर्करोगाने निधन झाले होते. बांदा पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून मृतदेहाचे बांदा प्राथमिक आरोग्य केंद्रात विच्छेदन करण्यात आले. बांदा पोलिसात आकास्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

**TRANSFER OF VEHICLE**

I, **NELSON SOARES** Husband of **Late JUSTINA M. F. D. SOARES** H.no – 101, TISK PONDA, PONDA, NORTH GOA, Goa 403401. Would Like to Transfer the Vehicle **Bearing Regn. No. GA-05-N-1834, HONDA MOTORCYCLE AND SCOOTER, Model: ACTIVA 4G, Chassis No:** ME4JF50CBJT182472, **Engine No:** JF50ET9182618 On **my name.**

If anybody has any objection they should inform to RTO Office PONDA within 15 days from the Publication of this Notice.

Sd/-

**NELSON SOARES**

जीपी पारसिक सहकारी बँक लि. (मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)

मुख्य कार्यालय : सहकारमूर्ती गोपीनाथ शिवराम पाटील भवन, पारसिक नगर, कळवा, ठाणे - ४००६०५. फोन नं. ०२२ २५४५६५००, Website : www.gpparsikbank.com

**विक्रीची जाहीर सुचना**

खालील कर्जदारांकडुन येणे थकबाकी असलेल्या बँकेच्या तारण कर्जाची वसुली करण्यासाठी सरफैसी ॲक्ट, २००२ अन्वये जीपी पारसिक सहकारी बँक लि. च्या प्राधिकृत अधिकारी यांनी खालील नमुद केलेल्या मालमत्तेची निम्नस्वाक्षरीकारांकडुन खालील अटी आणि शर्तीवर आणि ''जसे आहे जेथे आहे '' व ''जसे आहे जे आहे '' या तत्वाने स्थावर मिळकतीच्या खरेदीसाठी मोहरबंद पाकीटातुन प्रस्ताव दि. ०४/०३/२०२५ सायं. ५.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहे व लिलाव दि. ०५/०३/२०२५ रोजी स. ११.३० ते सायं. ४.०० वा. होणार आहे.

| कर्जदाराचे व जामिनदाराचे नाव | कर्ज क्र./ शाखा | मिळकतीचे वर्णन | मालमत्तेची राखीव किंमत व इसारा अनामत | जिच्या वसुलीसाठी मिळकत विकली जाणार आहे ती थकबाकी रक्कम (च्या मागणी सुचनेनुसार) |
|---|---|---|---|---|
| १) श्री. चौधरी डुंगारा राम पुन्माराम (कर्जदार व गहाणदार) २) श्री.कलबी बोमाराम मेघाराम (कर्जदार व गहाणदार) ३) सौ. विमला देवी (जामिनदार व गहाणदार), ४) सौ. कोकु देवी (जामिनदार व गहाणदार) ५) श्री. ढोलु मितेश रविलाल (जामिनदार) ६) श्री. सुथार पदमा राम मंगीलाल (जामिनदार) | ५६०/९ गोवा-मारगाव शाखा | इक्विटेबल तारण शॉप क्र.३०, (घर करारातील नोंदींनुसार घर क्र. ३/६२६०) एकूण २९.४४ चौ.मी., तळ मजला, बिल्डींग ए , "PALACIO DE SANT ANA GODINHO" गोवा-मारगाव येथे स्थित असुन सदर मालमत्तेचे बांधकाम हे "TERCEIRO LANCO DE GOGOLA UMAPARTE DO LADO NORTE" गोगळ गाव , मारगोवा महानगरपालिकेच्या हद्दितील तालुका व उप नोंदणी जिल्हा सालसेट जि.दक्षिण गोवा, फर्निचर, फिक्चर व फिटींग्ससह श्री. चौधरी डुंगारा राम पुन्माराम व श्री. कलबी भोमाराम मेघाराम यांच्या मालकीचे. | **राखीव किंमत** रु.७५,३०,२००/- **इसारा अनामत रक्कम** रु. ७,५३,०००/- | दि. १०/०१/२०२४ रोजी रु. ४२,७८,०८७.००/- अधिक पुढील व्याज व खर्च |
| सहभागी होण्यासाठी विनंतीपत्र/केवायसी दस्तावेज/इअरचा पुरावा इ. सादर करण्याची तारीख आणि वेळ **०४/०३/२०२५** रोजी **सायं. ५.००** पर्यंत | | **बोली वाढविण्याची रक्कम** रु. २५,०००/- | **मिळकतीचे निरीक्षण तारीख व वेळ** २८/०२/२०२५ स. ११.०० ते सायं. ५.०० दरम्यान | |
| | | | **लिलावाची तारीख आणि वेळ** ०५/०३/२०२५ रोजी स. ११.३० वाजता | |

विक्री तपशीलवर अटी व शर्तीसाठी कृपया जी पी पारसिक बँकेच्या तारण धनकोंच्या वेबसाईट : https://gpparsikbank.com/auctions.html मधील लिंकाचा संदर्भ घ्यावा.

**सरफैसी ॲक्ट अन्वये ३० दिवसांची वैधानिक विक्री सुचना**

कर्जदार/जामिनदार यांना याद्वारे लिलावाच्या तारखेपुर्वी आजतागायत व्याज आणि अनुषंगिक खर्चासह वरील रक्कम प्रदान करण्यास अधिसुचित केले जात आहे, कसुर केल्यास मिळकतिचा लिलाव/ विक्री होईल आणि शिल्लक थकबाकी असल्यास व्याज आणि खर्चासह वसुल केले जातील.

सही/-
प्राधिकृत अधिकारी
जी पी पारसिक सहकारी बँक लि.

दि. ०१/०२/२०२५
स्थळ : ठाणे

# सरकारी महाविद्यालय केपेत जी–२० कलाकृती संग्रहालयाचे उद्घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

**केपे, दि. २ :** २०२३ मध्ये भारताच्या जी २० अध्यक्षपदाचा एक भाग म्हणून गोव्यात झालेल्या जी २० बैठकीचा वारसा जतन करण्याच्या महत्त्वपूर्ण उपक्रमात, शाश्वतता सेल, अर्थशास्त्र विभाग, गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, केपे– गोवा, या दरम्यान वापरल्या गेलेल्या कलाकृतींचे एक संग्रहालय स्थापित केले आहे प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय कार्यक्रम.

गोवा सरकारच्या उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण के. सावईकर यांच्या हस्ते महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.जॉयदीप भट्टाचारजी आणि विभागप्रमुख डॉ. रेन्जी जॉर्ज अम्बल्लूर यांच्या प्रमुख उपस्थितीत संग्रहालयाचे उद्घाटन करण्यात आले. अर्थशास्त्र च्या. महाविद्यालयातील अर्थशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. विक्रांत



केपे : जी २० कलाकृती संग्रहालयाच्या उद्ाटनप्रसंगी उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक भूषण सावोईकर यांनी जी २० कलाकृतींच्या महत्त्वाविषयी माहिती दिली.

मुदलियार यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

भारताने आयोजित केलेली जी २० शिखर परिषद २०२३ हा आंतरराष्ट्रीय सहकार्याचा एक ऐतिहासिक क्षण होता, ज्यामध्ये देशभरात अनेक मंत्री आणि कार्यगटाच्या बैठका झाल्या. गोव्याला महत्त्वाच्या बैठका आयोजित करण्याचा आणि शाश्वतता, आर्थिक वाढ, डिजिटल परिवर्तन आणि सर्वसमावेशक विकासाशी संबंधित महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी जागतिक नेते आणि धोरणकर्त्यांना एकत्र आणण्याचा विशेषाधिकार मिळाला.

या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचा मूर्त वारसा जतन करण्याचे महत्त्व ओळखून, केपेच्या शासकीय महाविद्यालयाने गोव्यात झालेल्या जी २० बैठकीत वापरल्या गेलेल्या कलाकृतींचा संग्रह तयार केला आहे. या कलाकृती शाश्वतता, सांस्कृतिक वारसा आणि कारागिरीसाठी भारताच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहेत, ज्यामुळे जागतिक स्तरावर गोव्याची खास ओळख दिसून येते.

उद्घाटनादरम्यान श्री भूषण के. सावोईकर यांनी प्रत्येक कलाकृतीबद्दल सखोल माहिती दिली आणि तिचे सांस्कृतिक आणि कलात्मक महत्त्व स्पष्ट केले. संग्रहालयात गोव्याचा समृद्ध कलाकृती वारसा आणि शाश्वत पद्धतींवर प्रकाश टाकणाऱ्या वस्तूंची काळजीपूर्वक निवड केली आहे. उल्लेखनीय कलाकृतींपैकी कुणबी कापडापासून बनवलेली एक सुंदर हस्तकला शाल आहे, जी गोव्याच्या पारंपारिक विणकाम तंत्र आणि तेथील स्थानिक समुदायांची लवचिकता दर्शवते. पुनर्नवीनीकरण केलेल्या लाकडापासून बनवलेला आणि अझुलेजोस टाइलने सजलेला ट्रे गोव्यातील कलात्मकतेसह टिकाऊपणाचे मिश्रण करतो. टेराकोटा कमळाच्या आकाराचा अगरबत्ती होल्डर, स्थानिक कारागिरांनी तयार केलेला, शुद्धता आणि शांततेचे प्रतीक आहे, तर जीआय–टॅग केलेल्या स्पिरीटची बाटली गोव्याचा प्रसिद्ध डिस्टिलिंग वारसा आणि अस्सल स्थानिक चव दाखवते.